13 OCT 2026
पुढारी

महिलांनी शारीरिक, मानसिक आरोग्याला प्राधान्य द्यावे

प्र-कुलगुरू ज्योती जाधव; शिवाजी विद्यापीठात 'शी-टॉक' अंतर्गत महिला आरोग्यविषयक संवाद

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



महिलांनी शारीरिक व मानसिक आरोग्याकडे प्राधान्याने लक्ष देणे ही काळाची गरज आहे. दैनंदिन जीवनातील आरोग्यदायी सवयींचा अवलंब करून महिलांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील स्वयंसिद्धा सेंटर, बेटी बचाओ अभियान आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'शी-टॉक' उपक्रमांतर्गत आयोजित महिला आरोग्यविषयक संवाद कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी मानसशास्त्र अधिविभागाच्या प्रभारी विभागप्रमुख डॉ. प्रतिमा पवार होत्या. वित्त व लेखा अधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन रोपट्याला पाणी घालून झाले. यावेळी डॉ. जाधव यांनी उसापासून तयार होणाऱ्या गुळाचे आरोग्यविषयक महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वयंसिद्धा सेंटरच्या समन्वयक व समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रतिमा देसाई यांनी केले. विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. विनिता रानडे यांनी दैनंदिन आरोग्यदायी सवयी व आरोग्याची काळजी याविषयी मार्गदर्शन केले. समुपदेशक उर्मिला शुभंकर यांनी मानसिक स्वास्थ्य व ताण तणाव व्यवस्थापनाबाबत माहिती दिली. उपस्थित महिला व विद्यार्थिनींच्या आरोग्यविषयक शंकांचे निरसन करण्यात आले. सुप्रिया वडर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नेहा वाडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 OCT 2026


क्रांती सिंह

दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ

शिवाजी विद्यापीठातर्फे आधी भरलेले शुल्कही परत मिळणार

कोल्हापूर(प्रतिनिधी):- राज्यासह पश्चिम महाराष्ट्रात उद्भवलेल्या दुष्काळाच्या पार्श्व भूमीवर दुष्काळग्रस्त भागातील शाळा आणि महाविद्यालयां मधील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याची घोषणा शासनाने केली आहे. म्हणूनच मंगळवारी शिवाजी विद्यापीठाने फी माफीचे परिपत्रक जाहीर केले आहे. कार्यक्षेत्रातील सुमारे दोन लाख विद्यार्थ्यांना याचा फायदा मिळणार आहे.

शिवाजी विद्यापीठाने कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, समाजकार्य आणि शिक्षणशास्त्र अभ्यासक्र असणाऱ्या सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना तसेच अधिविभाग प्रमुख, संचालक व समन्वयक



यांना यासंदर्भात सूचित केले आहे. सन २०२६ च्या खरीप हंगामातील ट्रिगर वन प्रथम काळात लागू झालेल्या तालुक्यां मध्ये कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील विद्या र्थ्यांना फी माफीची ही सवलत मिळणार आहे. यामध्ये कोल्हा पूर जिल्ह्यातील पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड, आजरा आणि चंदगड या सहा तालुक्यांचा, सांगली जिल्ह्यातील कवठेमहांकाळ, मिरज, आटपाडी आणि जत या चार तालुक्यांचा तर सातारा जिल्ह्यातील सातारा, खटाव, माण, फलटण, खंडाळा आणि महाबळेश्वर या सहा अशा एकूण १६ तालुक्यांतील विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे. मात्र, यासाठी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाखांच्या आत असावे, असा नियम केला आहे. यासंदर्भात दि. १२ आणि १३ ऑक्टोबर पर्यंत प्रस्ताव सादर करण्याची मुदत विद्यापीठाने दिली आहे. हे पत्रक परीक्षा व मूल्यमापन मंडळाने प्रसिद्ध केले आहे.

भरलेले शुल्कही मिळणार परत-दरम्यान, २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र विद्यार्थ्यांनी यापूर्वीच परीक्षा शुल्क भरले असल्यास, त्यांना ही रक्कम परत मिळणार आहे. संबंधित विद्यार्थ्यांच्या अर्जाची छाननी करून पात्र रक्कम एकत्रित स्वरूपात परत करण्यात येणार आहे. यासाठी संबंधित महाविद्या लयांनी आवश्यक विवरणपत्रे परीक्षा विभागाकडे सादर करण्याचे आवाहन विद्यापीठाने केले आहे. तसेच, पात्र विद्यार्थ्यांनी अद्याप परीक्षा शुल्क भरले नसल्यास त्यांच्या कडून शुल्क आकारू नये, असे स्पष्ट निर्देशही विद्यापीठाने दिले आहेत.

13 OCT 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

गोविंदराव टेंबे यांचे संगीतसमीक्षा आणि साहित्य क्षेत्रालाही मोलाचे योगदान : केशवचैतन्य कुंटे

कोल्हापूर/प्रतिनिधी :

ज्येष्ठ संगीतकार गोविंदराव टेंबे यांनी संगीतक्षेत्राबरोबरच साहित्य आणि संगीतसमीक्षेतही मोलाचे योगदान दिले. त्यांच्या लेखनातून संगीतकलेचे सूक्ष्म आकलन, नाट्यप्रयोगांची जाण आणि तत्कालीन सांस्कृतिक जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण दिसून येते. त्यामुळे टेंबे यांच्या साहित्याचा अभ्यासकांनी अधिक सखोल अभ्यास करण्याची गरज आहे, असे मत पुणे येथील संगीतशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक केशवचैतन्य कुंटे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागात आज ज्येष्ठ संगीतकार व रंगकर्मी गोविंदराव टेंबे यांच्या स्मृतिदिनानिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी श्री. कुंटे बोलत होते. यावेळी ज्येष्ठ शास्त्रीय गायक संगीताचार्य पं. सुधीर पोटे उपस्थित होते.

कुंटे म्हणाले, टेंबे यांच्या लेखनातील रसास्वादक समीक्षा हा विशेष उल्लेखनीय पैलू आहे. त्यांच्या समीक्षेचा पुढील पिढ्यांतील लेखक आणि संगीताभ्यासकांवर प्रभाव पडला. वामनराव देशपांडे, अरविंद मंगळूरकर आणि पु. ल. देशपांडे यांसारख्या व्यक्तींनी संगीतविषयक लेखनातून या परंपरेला पुढे नेले. टेंबे यांच्या लेखनात कलाकृतीचा आस्वाद घेताना तिचे तांत्रिक आणि भावनिक पैलू उलगडण्याची क्षमता दिसून येते. उस्ताद अल्लादिया खाँ यांच्यावरील टेंबे यांचे चरित्र संगीतसाहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. व्यक्तिचित्रणासोबतच त्या काळातील संगीतविश्व आणि त्याचे वातावरण वाचकांसमोर उभे करण्याचे कसब त्यांच्या लेखनात दिसते. त्यांच्या गद्यशैलीत सूक्ष्म विनोद, सहजता आणि आशयघनता यांचा सुंदर मेळ आहे. नाट्यक्षेत्रातील अनुभवामुळे त्यांच्या नाट्यविषयक लेखनात प्रयोगशीलतेची आणि रंगमंचीय सादरीकरणाची जाणही प्रत्ययास येते.

टेंबे यांच्या साहित्याचा आवाका लक्षात घेता, त्यांच्या विविध लेखनप्रकारांचा स्वतंत्रपणे अभ्यास होणे आवश्यक आहे. त्यांच्या साहित्यकृती, संगीतसमीक्षा आणि चरित्रलेखन यांवर संशोधन प्रकल्प तसेच विद्यापीठीय प्रबंध हाती घेतल्यास त्यांच्या योगदानाचे अधिक व्यापक आकलन होऊ शकेल, असेही कुंटे यांनी नमूद केले.

यावेळी पं. सुधीर पोटे यांनी गोविंदराव टेंबे यांच्या संगीत, नाट्य आणि चित्रपट क्षेत्रातील योगदानाचा आढावा घेतला. ते म्हणाले, मराठीतील पहिला बोलपट 'अयोध्येचा राजा' यामध्ये वयाच्या पन्नासाव्या वर्षी नायकाची भूमिका साकारण्याचा मान टेंबे यांना मिळाला. 'मानापमान' नाटकाला त्यांनी दिलेले संगीत क्रांतिकारी ठरले. नाटकातील प्रसंग, गाण्याची वेळ आणि गायकाच्या आवाजाचा विचार करून संगीत रचण्याची त्यांची पद्धत वैशिष्ट्यपूर्ण होती. हार्मोनियम वादनातील त्यांची स्वतंत्र शैली, रागदारीतील व्यासंग आणि संगीतासाठी पहाटेपर्यंत सराव करण्याची चिकाटी त्यांच्या कलेप्रती असलेल्या निष्ठेची साक्ष देते, असे पोटे यांनी सांगितले.

पोटे म्हणाले, टेंबे यांची नाट्यकलेविषयीची भूमिका आजही मार्गदर्शक आहे. नाट्यकला हा केवळ धनोत्पादनाचा व्यवसाय नसून ती मानवी अंतःकरणाला स्पर्श करणारी, बुद्धीला चालना देणारी आणि जीवनाला सौंदर्य देणारी कला आहे, असा विचार त्यांनी मांडला होता. संगीत आणि कलाक्षेत्राबरोबरच क्रिकेट, वकिली आणि सर्कस व्यवस्थापन अशा क्षेत्रांतही त्यांनी काम



केले. त्यांच्या 'जीवनविहार' आणि 'माझा संगीत व्यासंग' या आत्मचरित्रांतून त्यांच्या अनुभवांचा आणि कलासाधनेचा परिचय होतो. कोल्हापुरातील नव्या पिढीला गोविंदराव टेंबे यांच्या कार्याची पुरेशी माहिती व्हावी, तसेच त्यांच्या विविध क्षेत्रांतील कर्तृत्वातून चिकाटी आणि समर्पणाची प्रेरणा घ्यावी, असे आवाहन पोटे यांनी केले.

यावेळी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनीही मनोगत व्यक्त केले. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. विनोद ठाकूर देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.विशाखा जोशी यांनी सूत्रसंचालन केले, तर श्रुती खोचीकर यांनी आभार मानले. गुणीदास फौंडेशनचे राजप्रसाद धर्माधिकारी, डॉ. भाग्यश्री मुळ्ये, मिलिंद गुणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

13 OCT 2026
सिंधुदुर्ग समाचार

शाही दसरा महोत्सवाचा भाविकांनी आनंद घ्यावा : डॉ.विजय राठोड



कोल्हापूर/प्रतिनिधी :

पावित्र्याचा,मांगल्याचा उत्सव म्हणजेच पर्यायाने नवरात्र महोत्सवाला रविवारपासून प्रारंभ झाला. या महोत्सवाचा भाविक - नागरिकांनी आनंद घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ विजय राठोड यांनी केले.

राज्य शासनाचचा पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,जिल्हा प्रशासन व दसरा महोत्सव समिती कोल्हापूरच्यावतीने भवानी मंडप येथे शाही दसरा महोत्सवाचे उद्घाटन रोपाला पाणी घालून व शस्त्र पूजन करून जिल्हाधिकारी व इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

व्यासपीठावर जिल्हा पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर जिल्हाधिकारी अजय पवार, शिवाजी विद्यापीठाच्या प्र. कुलगुरू प्रा.ज्योती जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव,मनपा उपायुक्त परितोष कंकाळ,क्रीडा उपसंचालक सुहास पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी विक्रम देशमुख,तहसीलदार तेजस्विनी पाटील,मंदिर समिती सचिव वर्षा साळुंखे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले, गेल्या दोन वर्षापासून राज्य शासनाने नवरात्र महोत्सवाला प्रमुख राज्य महोत्सव म्हणून जाहीर केले आहे. 11 ते 20 ऑक्टोबर या नवरात्र महोत्सव कालावधीत जिल्हा प्रशासनातर्फे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या उपक्रमामध्ये कोल्हापूरवासीयांनी मोठ्या संख्येने सहभाग दर्शवावा. तसेच यंदा दुष्काळ सदृश्य स्थिती असल्याने नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा त्याचबरोबर दुष्काळाची जाण ठेवावी असे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले. तत्पूर्वी उदय गायकवाड यांनी या महोत्सव आयोजना पाठीमागील भूमिका विशद केली.

या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी शाहीर आझाद नाईकवाडी यांनी शाहिरी पोवाडा सादर केला तर कोल्हापूर जिल्हा दांडपट्टा - लाठी असोसिएशनचे अध्यक्ष पंडित पोवार यांच्या मार्गदर्शनाखाली साहसी मैदानी खेळाचे प्रात्यक्षिक खेळाडूंनी सादर केले. या प्रात्यक्षिकाला जिल्हाधिकाऱ्यांसह उपस्थित मान्यवर व नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात मनमुराद दाद दिली.यावेळी पोलंडहून आलेल्या युवा विद्यार्थी शिष्टमंडळ समूहाचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी माय भारतचे उपसंचालक राहुल डोंगरे, राष्ट्रीय सेवा आयोजनाचे संचालक डॉ.कबीर खराडे, नायब तहसीलदार नितीन धापसे-पाटील, प्रमोद पाटील, अजेय दळवी यांच्यासह भाविक व इतर कलाप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

13 OCT 2026

पुण्यनगरी

जिल्हा युवा महोत्सवात शिवराज महाविद्यालयाचे यश

गडहिंग्लज : कोल्हापूर जिल्हा व मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये येथील शिवराज महाविद्यालयाने यश संपादन केले. मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये महाविद्यालयाचा विद्यार्थी अर्णव बुवा याने शास्त्रीय सुगम गायनमध्ये प्रथम, नाट्यसंगीतमध्ये तृतीय क्रमांक पटकावला, तर निमेश गिरीश देवार्डे याने शास्त्रीय सूर वाद्यामध्ये तृतीय क्रमांक पटकावला, तसेच कोल्हापूर जिल्हा युवा महोत्सवात अर्णव बुवा याने शास्त्रीय सुगम गायन प्रथम व प्रतीक्षा भोसले हिने मराठी वक्तृत्व स्पर्धेमध्ये पाचवा क्रमांक पटकावला. महाविद्यालयातील युवकांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी दरवर्षी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरमार्फत युवा महोत्सव आयोजित केला जातो. विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसन कुराडे, सचिव डॉ. अनिल कुराडे, उपाध्यक्ष ॲड. दिग्विजय कुराडे, संचालिका प्रा. बीनादेवी कुराडे आणि प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांचे मार्गदर्शन लाभले. समन्वयक म्हणून डॉ. अण्णासाहेब हरदारे आणि डॉ. दीपक खेडकर यांनी संयोजन केले.


10/13/26, 4:43 PM 13 OCT 2026 पुढारी 20261013_150637.jpg
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शहाजी लॉ कॉलेजचे युवा महोत्सवात यश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आयोजित ४६ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाते कौन्सिल ऑफ एज्युकेशन संचलित शहाजी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले. वैयक्तिक स्पर्धांमध्ये सर्वसाधारण विजेतेपदाचा फिरता चषक, वाङ्मय विभागात गौरव चषक, तर सांघिक स्पर्धांमध्ये सर्वसाधारण उपविजेतेपदाचा फिरता चषक महाविद्यालयाने पटकावला. मराठी वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय, हिंदी व इंग्रजी वक्तृत्व आणि प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून विद्यार्थ्यांनी बौद्धिक कौशल्य सिद्ध केले. पथनाट्य स्पर्धेत प्रथम, भारतीय समूहगीत आणि एकपात्री अभिनयात द्वितीय, पाश्चिमात्य एकल वादनात तृतीय, तर पाश्चिमात्य एकल गायनात चतुर्थ क्रमांक मिळवला. कातरकामात द्वितीय आणि लघुपट स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाला. एकांकिका स्पर्धेत उत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कारही विद्यार्थिनीने पटकावला. विद्यार्थ्यांच्या यशामुळे महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला.

जनसंपर्क कक्ष
13 OCT 2026 को.सि.सिंह शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सहकाराच्या विकासासाठी एकातरी संस्थेचे सभासद व्हा



कोल्हापूर(प्रतिनिधी):- सहकाराचा अभ्यास करून प्रत्येकाने किमान एका सहकारी संस्थेचा सभासद व्हावे. बदलत्या काळात सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा, असे आवाहन सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर यांनी केले.

गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र, अर्थशास्त्र विभाग, वाणिज्य व व्यवस्थापन विभाग आणि एमबीए विभागातर्फे सहकारा द्वारे सर्वसमावेशक शाश्वत विकास या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. राजनीश कामत अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, अधिसभा सदस्य संजय परमणे तसेच विविध सहकारी संस्थाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पाचपोर म्हणाले, सहकारामध्ये प्रचंड ताकद असून त्यातून गावाचा विकास, रोजगारनिर्मिती आणि शिक्षण क्षेत्रात प्रगती साधता येते. सहकाराच्या माध्यमातून आत्मनिर्भरता निर्माण होऊ शकते. सहकाराचे स्वरूप आणि कार्यपद्धती समजून घेतल्यास माणसाचा शाश्वत व सर्वांगीण विकास साधता येतो. सहकारी संस्था चालविणाऱ्या संचालक मंडळाला कोणतेही मानधन मिळत नाही. त्याग आणि सेवाभावातून सहकाराची चळवळ पुढे जाते. गोकुळ, अमूल आणि इफ्को यांसारख्या संस्था शाश्वत विकासाची उत्तम उदाहरणे असल्याचे सांगितले.


अध्यक्षीय भाषणामध्ये कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी सहकार क्षेत्र हे सर्वसमावेशक विकासाचे एक सिद्ध झालेले मॉडेल असलेचे नमूद केले. त्यांनी यशस्वी सहकारी व्यवस्था ही संस्कार व मानवी मूल्यावर आधारित आहे, या लक्ष्मणराव इनामदार यांच्या विचाराची आठवण करून दिली. ग्रामीण भागाचा काया पालट करण्याची शक्ती सहकारामध्ये असून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सहकारामध्ये नवीन संस्था उद्यास येत असून त्याद्वारे कार्यक्षमता वाढत असलेचे मतही व्यक्त केले. केंद्राचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शामल पवार यांनी आभार मानले.

13 OCT 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जातिभेद आणि स्त्री-पुरुष विषमता हे राष्ट्रीय एकात्मतेसमोरील प्रमुख अडथळे : ज्ञानेश्वर बंडगर महाराज



कोल्हापूर/प्रतिनिधी : सामाजिक समतेतूनच राष्ट्रीय एकात्मतेचा पाया भक्कम होतो. समाजातील जातिभेद आणि स्त्री-पुरुष विषमता दूर केल्याशिवाय खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकता, एकात्मता निर्माण होऊ शकत नाही. त्यामुळे या विषमतेचे उच्चाटन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्ञानेश्वर बंडगर महाराज यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित कै. कासुबाईयलबाजी ममता तुकाराम मंगल स्मृती व्याख्यानमालेत 'सामाजिक समता व राष्ट्रीय एकता' या विषयावर ते बोलत होते. विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

बंडगर महाराज म्हणाले, महाराष्ट्रातील भक्ती आणि वारकरी परंपरेने सामाजिक समतेचा विचार सातत्याने मांडला आहे. राष्ट्रातील नागरिकांमध्ये परस्परांप्रती बंधुभाव, समानतेची भावना आणि एकत्व निर्माण झाल्याशिवाय राष्ट्रनिर्मितीची प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमध्ये सामाजिक समता आणि राष्ट्रीय एकात्मतेचा मूलभूत आशय आहे.

देशाच्या प्राचीन इतिहासात भगवान बुद्ध, भगवान महावीर आणि सिद्ध परंपरेने सामाजिक समतेच्या प्रस्थापनेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. महात्मा फुले यांनी मांडलेला एकत्वाचा विचार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातिव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी केलेले वैचारिक कार्य हे समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी मार्गदर्शक ठरणारे आहे. जातिव्यवस्था ही केवळ सामाजिक विषमतेपुरती मर्यादित नसून तिचा आर्थिक विषमतेशीही घनिष्ठ संबंध आहे. त्यामुळे जातिव्यवस्थेचे समूळ उच्चाटन करणे आवश्यक आहे. त्यासाठी धार्मिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रांत परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे. सामाजिक समतेचा विचार प्रत्यक्ष व्यवहारात रुजल्यास राष्ट्रीय एकात्मता अधिक दृढ होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय मनोगतात प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, सामाजिक समावेशन केंद्राच्या माध्यमातून विद्यापीठ समाजातील विविध घटकांना जोडून घेण्याबरोबरच त्यांना मुख्य प्रवाहात ओळख प्रदान करण्यासाठी प्रयत्नशील आहे. येथील व्याख्यानांमुळे वैचारिक प्रबोधनासोबतच मानसिक समाधानही लाभते.

अभ्यास केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अविनाश भाले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. किरण पवार, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. किशोर खिलारे, उदय पोवार, डॉ. युवराज कदम, डॉ. रामचंद्र पवार, राजेश मेश्राम, दिनेश उथळे, डॉ. अनमोल कोठडिया, यश आंबोळे, विश्वजीत गुरव, शरद पाटील, माऊली पांढरे आणि दत्ता घुटूकडे यांच्यासह विद्यापीठातील विविध अधिविभागांचे प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

13 OCT 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

"आयडियाज् टुडे, इनोव्हेशन्स टुमारो, इम्पॅक्ट फॉरेव्हर"

कोल्हापूर/प्रतिनिधी :

विद्यार्थ्यांमधील संशोधनगुणांना प्रेरणा देण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागातर्फे "आयडियाज टुडे, इनोव्हेशन्स टुमारो, इम्पॅक्ट फॉरेव्हर" या घोषवाक्यासह 'नॅनोस्पार्क २०२६' या विशेष संशोधनपर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. 'आविष्कार' संशोधन स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर "इग्नायटिंग यंग माइंड्स फॉर आविष्कार" या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात ७५ संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण वैज्ञानिक प्रकल्पांचे सादरीकरण केले. त्यामध्ये ५ वैज्ञानिक मॉडेल्स आणि २६ वैज्ञानिक पोस्टर्स यांचा समावेश होता.



या वैज्ञानिक सादरीकरणासाठी एकूण ६ विद्याशाखांमधील विषय देण्यात आले. यामध्ये मानव्यविद्या व ललितकला, वाणिज्य व विधी, केवल विज्ञान, कृषी, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शाखा या क्षेत्रांचा समावेश होता. यात पदवीस्तरीय, पदव्युत्तर आणि पीएच.डी. स्तरीय संशोधक विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

विद्यार्थ्यांच्या संशोधन सादरीकरणाचे राष्ट्रीय स्तरावरील शास्त्रज्ञांकडून मूल्यांकन व परीक्षण करण्यात आले. त्यासाठी पुण्याच्या सीएसआयआर- राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा येथील प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. बाबुल प्रसाद, डॉ. जे. नित्यानंदन आणि डॉ. प्रकाश वाडगावकर उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठाच्या जैवरसायनशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक व विद्यापीठाचे 'आविष्कार' समन्वयक डॉ. पंकज पवार यांनीही परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली.

प्रकल्प सादरीकरणानंतर उपस्थित शास्त्रज्ञांनी विद्यार्थ्यांसमवेत सुमारे दोन तास थेट संवाद साधला. त्यांनी विद्यार्थ्यांना संशोधनातील आधुनिक आव्हाने, पेटंट्स आणि भविष्यातील संधींबद्दल मार्गदर्शन केले व शंकानिरसन केले.

शेवटच्या सत्रात उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्यांना पुरस्कार व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यामध्ये पदवीस्तरीय विभागातील ४ व पदव्युत्तर विभागातील ४ अशा एकूण ८ सादरीकरणांना पुरस्कार मिळाले. यामध्ये सहारा पटेल (B.Sc.-III), तन्मयी पाटील (B.Sc.-II), अंकित कुमार, तन्वी वडनाल, अंजली मायने (तिघेही B.Sc.-II), पूर्वा खरात, कावेरी पुजारी (B.Sc.-I), समृद्धी गावडे (M.Sc.-I), प्रज्वल पाटील (M.Sc.-I), लंगम्बा थानओजम (M.Sc.-I), प्रणव कांबळे (M.Sc.-II) यांचा समावेश आहे.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी स्कूलचे संचालक प्रा. किरणकुमार शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
13 OCT 2026 लोलीसिंह शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कौशल्य व तंत्रज्ञानाने ग्रामीण शिक्षण बदलेल

गारगोटी(प्रतिनिधी):- ग्रामीण शिक्षणाची पाळेमुळे जिथे रुजली, त्याच मौनी विद्यापीठाला केंद्रस्थानी ठेवून ग्रामीण शिक्षणाचा चेहरामोहरा बदलण्याचा निर्धार शिवाजी विद्यापीठाने केला आहे. मौनी विद्यापीठासारख्या संस्थांच्या सहकार्याने चाकोरी मोडून गुणवत्तापूर्ण, प्रयोगशील आणि भविष्याभिमुख शिक्षणाचा नवा प्रयोग राबविण्यात येणार असून, देशातील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयोग ठरेल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी व्यक्त केला.

येथील श्री मौनी विद्यापीठातर्फे आयोजित तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रामीण-शहरी शैक्षणिक दरी कमी करणे या विषयावरील मुक्त संवाद कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. मौनी विद्यापीठाचे अध्यक्ष मधुकर देसाई अध्यस्थानी होते. नाबार्डचे माजी अध्यक्ष व मौनी विद्यापीठाचे संचालक डॉ. यशवंतराव धोरात, गरवारे टेक्निकल फायबर्सचे अध्यक्ष डॉ. संजय चराटी, डॉ. डी. वाय.पाटील शिक्षण संकुलाच्या सीईओ देवश्री पाटील, माजी प्राचार्या डॉ. अनिता बोडके, मौनी विद्यापीठाच्या विश्वस्त पल्लवी कोरगावकर आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, एक विद्यापीठ, दहा महाविद्यालये, शंभर शाळा हा उपक्रम शिवाजी विद्यापीठाने हाती घेतला असून यामध्ये मौनी विद्यापीठाचा पहिला समावेश असेल. सध्या तंत्रज्ञानाचा वापर करून स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती होईल, असे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.डॉ. यशवंतराव थोरात म्हणाले, ग्रामीण आणि शहरी भागातील शैक्षणिक दरी कमी करणे ही काळाची गरज आहे. यावेळी डॉ. संजय चराटी यांनी मनोगत केले.

प्राचार्य डॉ. उदयकुमार शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.मौनी विद्यापीठाचे संचालक डॉ. पी. बी. पाटील यांनी आभार मानले. यावेळी जिल्हा बँकेचे संचालक प्राचार्य अर्जुन आबिटकर, सदस्य बाजीराव चव्हाण, कर्मचारी प्रतिनिधी डॉ. अरविंद चौगले, उपप्राचार्य डॉ. संजय देसाई, सुन्निल तांबेकर यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक उपस्थित होते. डॉ. ऋतुजा लाड यांनी सूत्रसंचालन केले.

13 OCT 2026
तरुण भारत

शाहू कॉलेज येथे संस्थात्मक अविष्कार अनुसंधान स्पर्धा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि रयत शिक्षण संस्था यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार शाहू कॉलेज कदमवाडी येथे संस्थात्मक पातळीवरील अविष्कार अनुसंधान स्पर्धा झाली. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक दृष्टिकोन वाढीस लागावा हा यामागचा मुख्य उद्देश होता. ही स्पर्धा कला, भाषा आणि साहित्य ललित कला, वाणिज्य व्यवस्थापन आणि कायदा, शुद्ध विज्ञान, कृषी आणि पशुधन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान व वैद्यकीय आणि औषधनिर्माण अशा सहा विषयात पार पडली. या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालय विकास समितिचे सदस्य सरदार जाधव यांच्या शुभहस्ते करण्यात आले. स्पर्धेच्या परीक्षक म्हणून डॉ. कल्पना पाटोळे, डॉ. संतोष कांबळे, डॉ. बाबासाहेब सायमोते, श्रीमती झेबा शेख इ. तज्ज्ञ उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये विविध महाविद्यालयाच्या विविध विषयांच्या ७८ विद्यार्थ्यांनी आपल्या नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्पाचे सादरीकरण केले. यातील प्रत्येक वर्गातील दोन प्रकल्प पुढील स्पर्धेसाठी निवडले गेले. याप्रसंगी अंतर्गत हमी कक्षाचे प्रमुख डॉ. यु. एस. शेळके, विज्ञान विभागाचे उपप्राचार्य, प्रो. डॉ. पी. बी. पिस्टे, कला विभागाच्या उपप्राचार्या, डॉ. एम. बी. देसाई, डॉ. एस. पी. खोले उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
13 OCT 2026
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

दृष्टी दिव्यांगांचा विद्यापीठात प्रवेश

प्रतिनिधी, कोल्हापूर

शिक्षणाची जिद्द व आत्मविश्वास यांचे प्रेरणादायी उदाहरण ठरत तीन दृष्टीदिव्यांग (अंध) विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात एम.ए. भाग-१ (इतिहास) या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे.

दृष्टिहीन असूनही उच्च शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा आणि चिकाटीच्या बळावर हणबरवाडी येथील अंध युवक मंच संचालित अंध मुला-मुलींचे निवासी वसतिगृह येथील पवन कागले, विकास पाईकराव तसेच पलूस (जि.सांगली) येथील अशोक चौगुले या विद्यार्थ्यांनी दूरशिक्षणाचा पर्याय स्वीकारला. अशोक चौगुले यांनी या अगोदर दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातून समाजशास्त्र व राज्यशास्त्र या विषयातून एम.ए.पदवी प्राप्त केली आहे. शिवाजी विद्यापीठाचे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र हे सर्वसमावेशक शिक्षणाला प्राधान्य देत विविध घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देत आहे.

या विद्यार्थ्यांचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे, संचालक डॉ.प्रतिभा पाटणकर, उपकुलसचिव विनय शिंदे, समन्वयक डॉ.कृष्णा पाटील, दिलीप मोहाडीकर, इतिहास विषयाचे डॉ.मुफिद मुजावर यांनी अभिनंदन केले.

ब्रेल लिपीतील नामफलक

विद्यापीठातील विविध अधिविभाग व प्रशासकीय विभागाच्या प्रवेशद्वारांवर दृष्टीहीन विद्यार्थ्यांसाठी ब्रेल लिपीमधील नामफलक लावले आहेत. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रात लावलेल्या ब्रेल लिपीमधील नामफलक वाचून या विद्यार्थ्यांनी प्रशासनास धन्यवाद दिले.

13 OCT 2026
पुढारी



आंतरविभागीय महिला रोप मल्लखांब स्पर्धेत आजरा महाविद्यालय प्रथम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ येथे झालेल्या आंतरविभागीय महिला रोप मल्लखांब स्पर्धेत विजेतेपद पटकाविणारा आजरा महाविद्यालयाचा महिला संघ : पायल कोकितकर, सुहाना हिंग्लजकर, समीक्षा केसरकर, वैभवी तेजम, सिद्धी करमळकर आणि सानिका करमळकर यांचा समावेश आहे. सर्वांना अशोक चराटी, विलासराव नाईक, डॉ. अनिल देशपांडे, रमेश कुरुणकर, डॉ. दीपक सातोस्कर, विजयकुमार पाटील, के. व्ही. येसणे, अनिकेत चराटी, आय. के. पाटील, प्राचार्य डॉ. किरण पोतदार, उपप्राचार्य दिलीप संकपाळ, योगेश पाटील, मनोज पाटील, क्रीडा संचालक डॉ. धनंजय पाटील आणि अल्बर्ट फर्नांडिस यांचे मार्गदर्शन लाभले.

13 OCT 2026
सकाळ

विशांत भोसले यांना पीएच.डी.


विशांत भोसले

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विषयाचे पीएच.डी. संशोधक विशांत भोसले यांनी "अ स्टडी ऑफ फार्मास्युटिकल डिस्ट्रिब्युशन सिस्टम वर्कर्स इन कोल्हापूर ॲन्ड सांगली डिस्ट्रिक्ट" यावर संशोधन पूर्ण केले. त्यांना अर्थशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी मिळाली. देवचंद कॉलेजचे प्रा. डॉ. एस. एस. रूपे यांच्या मार्गदर्शनाखाली व अर्थशास्त्र अधिविभागातील प्राध्यापकांच्या सहकार्याने त्यांनी हे संशोधन पूर्ण केले. या संशोधनामध्ये औषध वितरण प्रणालीतील कामगारांची सामाजिक-आर्थिक परिस्थिती, कल्याणकारी स्थिती, रोजगारविषयक बाबी आदी समस्यांचा अभ्यास केला आहे.